वाचले –

१)माध्य/शि/०४/कावि/६७१/२०१७ दि.१७/१०/२०१७
२)माविभो/०१/कावि/९५/२०१८ दि.०६/०३/२०१८
३)माध्य/शि/०१/कावि/११०९/२०१८ दि.०१/११/२०१८ चे पत्र
४)श्री.शिंगाडे विलास तुकाराम सहा.शिक्षक यांचे दि.१३/१२/२०१८ चे पत्र
५)माध्य/शि/०१/कावि/६०/२०१९ दि.१५/०१/२०१९ ची नोटीस
६)श्री.शिंगाडे विलास तुकाराम सहा.शिक्षक यांचा दि.१६/०१/२०१९ चा खुलासा
७)मा.शिक्षणाधिकारी यांचा दि.०३/०५/२०१९ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/१/कावि/२२० /२०१९
दिनांक ०३/०५/२०१९

विषय –सक्त ताकीद देणेबाबत...

श्री.शिंगाडे विलास तुकाराम (सहा.शिक्षक)

आदेश,

माध्यमिक शिक्षण विभागाकडील माध्यमिक शिक्षकांना चट्टोपाध्याय आयोगानुसार १२ वर्षाचा लाभ मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांचेकडील वाचले क्र.०१ च्या आदेशान्वये मान्यता देणेत आलेली होती. वाचले क्र.०२ च्या आदेशान्वये श्री.शिंगाडे यांची १२ वर्षाची वेतननिश्चिती करणेत आलेली होती. वाचले क्र.०३ च्या पत्रान्वये विद्यालयाला वाचले क्र. ०१ च्या आदेशाचे अवलोकन करून श्री. शिंगाडे यांचे वेतननिश्चिती बाबत कळविलेले होते.तरी पुनश्च विद्यालयाने व श्री.शिंगाडे यांनी संबधित आदेशान्वये वेतन मिळणेबाबत विनंती केलेली होती. त्याबाबत श्री. शिंगाडे यांना त्याबाबत त्यांना वाचले क्र. ०५ अन्वये नोटीस देणेत आलेली होती. वाचले क्र.०६ अन्वये श्री.शिंगाडे यांनी त्याबाबत खुलासा सादर करणेत आलेला आहे.

श्री.शिंगाडे यांनी विद्यालयाच्या कार्यालयाच्या कामकाजात हस्तक्षेप करून १२ वर्षीच्या वेतननिश्चिती चुकीची करून एप्रिल – २०१८ पासुन जादा वेतन घेऊन मनपाची आर्थीक फसवणुक केल्याचे दिसुन येत आहे. श्री. शिंगाडे यांना जादा दिलेले वेतन वसुल करून वाचले क्र.०२ चे वेतननिश्चिती आदेश रद्द करणेत आलेले आहेत. तसेच त्यांची जादा वेतनाची वसुली पुर्ण झालेनंतर त्यांची १२ वर्षाची दुरूस्त वेतननिश्चिती प्रस्ताव सादर करणेत कळविलेले आहे. श्री. शिंगाडे यांचा खुलासा मान्य करणेत येउन सक्त ताकीद देणेत येत आहे.

सबब मी शिक्षणाधिकारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पिंपरी – १८ या आदेशान्वये श्री. शिंगाडे विलास तुकाराम ( सहा.शिक्षक) यांनी भविष्यात अशा प्रकारे वर्तन केल्यास त्यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका कलम ५६ (२) ड अन्वये यापुढील कारवाई करणेत येईल यांची त्यांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

प्रति,
मुख्याध्यापक,
माध्यमिक विद्यालय भोसरी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

२/- सदर नोटीस श्री.शिंगाडे विलास तुकाराम (सहा.शिक्षक) यांना बजावणेत येउन पुर्तता अहवाल सादर करणेत यावा.

Scanned by CamScanner